classmate

Date ⑦
Page

# विजयादशमी

आश्विन महिन्याची शुक्ल पक्षातील दशमी तिथी ही विजयादशमी (दसरा) म्हणून ओळखली जाते. हा दिवस साडे तीन मुहूर्तातील एक महत्त्वाचा मुहूर्त म्हणूनही मानतात.

शरद ऋतुचा मन प्रफुल्लीत करणारा अनुभव देत देत जगज्जननी आदिमाया घटात विराजमान होते. नऊ रात्री ज्ञानाचा अखंड नंदादीप तेवत ठेवून ज्ञानरुपी घटातच ती साधना करते. शक्तीसंचय करते आणि झळाळत्या ज्ञानाने व मूर्तिमंत पौरुषाने जग जिंकायला निघते. दसऱ्याला धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सव म्हणून महत्त्व आहेच तसेच त्याचे राजकीय आणि सामाजिक महत्त्वही खासच आहे. पराक्रम-पुरुषार्थाची उपासना करणारा आणि क्षात्रियांच्या बाहूंना स्फुरण चढवणारा असा हा उत्सव आहे.

खंडेनवमीला अस्त्र-शस्त्राचे पूजन केले जाते. शिल्पकार आणि कारागीर या दिवशी आपल्याला लागणाऱ्या हत्यारांची, साहित्याची पूजा करतात. भारतीय संस्कृतीनुसार लहान मुलांचा अक्षर ओळख संस्कार केला जातो. या दिवशी सरस्वतीचे पूजन केले जाते.

महिषासुरमर्दिनीने महिषासुराचा वध केला. तसाच रामाने रावणाचा वध केला. या दोन्ही कथा दुष्ट प्रवृत्तीवरील सुष्टांचा विजय सूचित करतात. कधीही पराजित न होणारी देवता अर्थात अपराजिता!! म्हणूनच दसऱ्याच्या दिवशी तिचे आणि शमी पूजन केले जाते. राजा या दिवशी प्रतिकात्मक पद्धतीने आपल्या दिग्विजयाची सुरवात म्हणून गावाची सीमा ओलांडून जातो. घोडदळ, पायदळ, हत्तीदळ सगळ्या लवाजम्यासह नगर प्रदक्षिणा करतो. राजा परत आल्यावर राजघराण्यातील स्त्रिया विजयाचे प्रतिक म्हणून राजाला औक्षण करतात.

शमीचे झाड नसेल तर अश्मंतक म्हणजे आपट्याचे पूजन करावे. नवरात्री पूजन हे स्त्रीच्या सामर्थ्याचे पूजन आहे. आधुनिक काळातील समाजातील अराजकता पाहता स्त्रीयांनी सक्षम होणे आणि वाईट गोष्टींचा समूळ नायनाट करण्यासाठी संघटना स्वरूपात काम करणे आवश्यक आहे. हाच विचार या सणातून मांडला गेला आहे. कठीण परिस्थितीचा सामना करायला आणि धीराने आलेल्या संकटाला तोंड द्यायला शिकवणारी आणि लखलखत्या तेजाने भारावून टाकणारी अशी ही आपली आदिमाता-आदिशक्ती !! मनामध्ये वीरवृत्ती जागवणे म्हणजेच

खरे दसरा पूजन लोभ, आळस, मोह अशा दुर्गुणांच्या सीमा ओलांडून जाणे हेच खरे सीमोल्लंघन आणि वाईट प्रवृत्तींचा नाश करणे हेच जणु दसऱ्याच्या दिवशीचे रावणदहन ही प्रतिकात्मता शिकवण्यासाठी आहे.

म्हैसूर येथील दसरा सण किंवा कर्नाटक संस्थानातील दसरा मिरवणूक ही प्रसिद्ध आहे. पण हे केवळ शक्ती आणि समृद्धीचे प्रदर्शन नाही, त्याद्वारे प्रजेला आपल्या राज्यातील सुव्यवस्था आणि सैन्याचे सामर्थ्य कळते आणि प्रजेने राजाच्या व्यवस्थेखाली सुरक्षित असल्याचा अनुभव घेणे हे आजच्या काळातही उपयुक्त आहे.

सरस्वती ही वैदिक देवता. मूळ सरस्वती ही नदी असून तिच्या काठी संस्कृती वसली; म्हणून नदीचे महत्त्व आणि शमीपूजन; अश्मंतक पूजन यातून पर्यावरण रक्षणाचा ध्यास आपण घेतला पाहिजे. कोजागिरी पौर्णिमेला देवी विचारत येईल की "को जागर"? कोण जागं आहे? त्याला मी संपत्ती देईन !!

तर दरवर्षी अत्यंत उत्साहाने येणारा दसरा त्याचे स्वागतही तसेच जोमाने व्हायला हवे नं ?? त्यामागची संकल्पना कळावी; म्हणून हा लेखनप्रपंच !!

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी.



श्री. प्रकाश देशपांडे